**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 17.08.2024** **वार – शनिवार**

---

मुख्यमंत्री लाडकी बहीण

महिला लखपती झालेल्या बघण्याची, त्यांना आत्मसन्मान मिळवून देण्याची शासनाची इच्छा असून महिलांच्या विकासाच्या योजना राबवण्यासाठी हात आखडता घेतला जाणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पुण्यात दिली. राज्य सरकारच्या "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेच्या राज्यस्तरीय लाभ वितरण कार्यक्रमात ते आज पुण्यात बोलत होते. या योजनेतून मिळणाऱ्या पैशांतून कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासोबत लाभार्थी महिलांना आर्थिक उन्नती साधता येईल असं मुख्यमंत्री म्हणाले. कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.
महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू, अशी ग्वाही देत या योजनेसाठी मार्च २०२५ पर्यंतची तरतूद केली असून पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.
तर यापुढेही या योजनेत सातत्य राहणार असून एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं.

शिक्षण आराखडा

शिक्षण विभागातर्फे राज्यातल्या शाळांसाठी स्वतंत्र सर्वसमावेशक आराखडा तयार केला जाणार आहे . शिक्षणाचा दर्जा सुधारावा त्याचबरोबर शैक्षणिक क्षेत्रातील शहरी आणि ग्रामीण भेद दूर होऊन सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळावी या उद्देशानं हा आराखडा तयार केला जाणार आहे. त्यासाठी राज्याचे

शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समितीची स्थापना करण्यात आली आहे.

तक्रारकक्ष

पुणे महापालिका आयुक्त कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांचं निराकरण करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी एक स्वतंत्र कक्ष स्थापन केला आहे. उपायुक्त अविनाश सपकाळ हे या कक्षाचे अध्यक्ष तर पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पथ, बांधकाम, अतिक्रमण निर्मूलन आणि घनकचरा विभागाचे कार्यकारी अभियंता सदस्य असतील . सोमवार ते गुरूवार दुपारी साडेतीन ते साडेपाच या वेळेत महापालिका आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृहात हा कक्ष काम करेल.

संप
पश्चिम बंगालमधील महिला डॉक्टरवरील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशननं आज देशव्यापी संप पुकारला आहे.  पुण्यातही ससून रुग्णालयाच्या बाहेर आयएमए आणि निवासी डॉक्टरांनी आंदोलन केलं. खाजगी डॉक्टरांनी देखील वैद्यकीय सेवा आणि बाह्य रुग्ण विभाग बंद ठेवला. यामुळे अत्यावशक सेवा वगळता वैद्यकीय सेवेवर मोठा परिणाम दिसून आला.

लेसर बीम बंदी

गणेशोत्सवाप्रमाणेच दहीहंडी उत्सवाच्या काळात सुद्धा लेसर बीमवर बंदी घालण्याची मागणी पुणेकर नागरिकांकडून करण्यात आली आहे. लेसर बीम वर आगामी गणेशोत्सव काळात पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय पोलीस विभागानं नुकताच जाहीर केला. शहरात गणेशोत्सवाप्रमाणेच दहीहंडी उत्सव देखील मोठ्या उत्साहात साजरा केला जातो आणि यानिमित्तानं अनेक मंडळांकडून रात्री उशिरापर्यंत डीजेच्या दणदणाटासह अनेकविध प्रकारचे लेसर शो आयोजित केले जातात. त्यामुळे त्यावर बंदीची मागणी नागरिकांनी केली आहे.

नारद माध्यम पुरस्कार

विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने दिल्या जाणाऱ्या आद्य पत्रकार देवर्षि नारद पत्रकारिता पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. संपादक सम्राट फडणीस, वार्ताहर प्रसाद पानसे, सोशल मीडिया क्षेत्रातले सूरज खटावकर आणि प्रशांत दांडेकर तसंच कोल्हापूरच्या खाजगी वाहिनीच्या कार्यकारी निर्मात्या  रसिका कुलकर्णी यांचा पुरस्कारार्थ्यांमध्ये समावेश आहे. विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे परिषद आणि नियामक मंडळाचे  कार्यवाह आनंद काटीकर यांनी पत्रकार परीषदेत ही माहिती दिली. येत्या गुरूवारी 22  ऑगस्टला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

क्रीडा

पुण्यात आजपासून 1800 गुणांखालील बुद्धीबळपटूंची आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा सुरू झाली आहे. यामध्ये पहिल्या फेरी अखेर महाराष्ट्राचे ईश्वरी जगदाळे आणि निमिष ठुबे तीन गुणांसह संयुक्त आघाडीवर आहेत. स्पर्धेत एकूण नऊ फेऱ्या होणार असून यामध्ये अमेरिका, केनिया सह देशभरातून 380 खेळाडू सहभागी झाले आहेत.

पुणे जिल्हा परिषद आणि जिल्हा क्रीडा विभागाच्या आंतर शालेय बॅडमिंटन स्पर्धेत 17 वर्षाखालील मुलांच्या गटात चिखलीच्या जी जी इंटरनॅशनल स्कूल संघानं अजिंक्यपद पटकावलं. शार्दुल आवारी आणि अर्णव बोराटे हे या विजयाचे शिल्पकार ठरले.

हवामान-आयएमडी
पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 32 तर किमान तापमान 22 अंश सेल्सिअस होतं. उद्या कमाल तापमानात किंचित घट होईल, दुपारनंतर आकाश

अंशतः ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी पडतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार.